# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २३/०४/२०२३

➢ दुखापत   :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र. २९८/२०२३ कलम ३२४,५०४,३४ भादवि. | महादेव खोरी ते वडाळी सुपर हायवे रोडवर गुणवंत बाबा मंदीर जवळ अमरावती | दि.२२/०४/२०२३ चे २०.३० वा<br>दा.ता.वेळ दि.२३.०४.२०२३ चे ०१.१५ वा | संतोष रमेश गवई वय ३८ वर्ष,रा. निंभोरा पो.स्टे. बडनेरा जि. अमरावती | तिन संशयीत इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे दररोज सकाळी १०.०० वा ते रात्री ०८.०० वा पर्यंत नौकरी करतो स्वताचे मोटर सायकलने. दि.२२.०४.२०२३ रोजी रात्री ०८.०० वा ड्युटी संपली  व फिर्यादी हे मोटरसायकलने ड्रीमलॅन्ड येथुन घरी निंभोरा येथे जाण्याकरिता सुपर हायवे ने निघाले असता फिर्यादीला नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी एका इसमाने हात दाखवुन थांबण्याचा इशारा केला म्हणुन फिर्यादीने  गाडी स्लो केली तेवठ्यात एका इसमाने फिर्यादीचे गाडीसमोर त्याची मोटर सायकल आढवी केली व फिर्यादीला हाताबुक्यांनी मारहाण केली. त्याठिकाणी एकुण सहा लोक होते त्यातील तिन लोकांनी फिर्यादीला मारहाण केली व बाकी तिन लोक त्यांना समजवात होते परंतु ते लोक समजत नव्हते व मारहाण करुन शिवीगाळ करत होते. त्यातील एका इसमाने फिर्यादीच्या डोक्यावरिल हेलमेट काढुन फिर्यादीच्या डोक्यावर मारले व फिर्यादी खाली पडला आणि लोक तेथुन पळुन गेले. त्या लोकांना फिर्यादी ओळखत नाही त्यांनी तोंडावर दुप्पटा बांधले होते. काही वेळाने फिर्यादी  स्वताच  उठला व गाडीने घरी निंभोरा येथे गेले तेथुन फिर्यादी हे त्यांचे पत्नि हीला घेवुन इर्विन दवाखाना मध्ये इलाजा करिता रात्री ०९.३० वा आले. सध्या फिर्यादी चा इर्विन दवाखाना येथे वार्ड नं.१३ मध्ये उपचार सुरु आहे. फिर्यादीचे घरा शेजारी शेखर वानखडे वय ३५ वर्ष, हा राहत असुन तो चायनिस गाडीवर काम करतो याचे सोबत काही दिवसा पुर्वी फिर्यादीचे वाद झाला होता. त्याने फिर्यादीला मारण्याची धमकी दिली होती तसेच त्याचा त्रि अंकुश हनवते हा त्याच्या सोबत नेहमी राहतो फिर्यादी व शेखर वानखडे यांच्यात वाद झाला तेव्हा तो सुध्दा हजर होता फिर्यादीला दि.२२/०४/२०२३ रोजी रात्री ०८.३० वा. वडाळी समोर सुपर हायवे वर त्यांनीच मारहाण केल्याचा संशय आहे. अश्या फिर्यादीच्या जबाणि रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पोस्टे राजापेठ अप क्र ३८४/२०२३ कलम ३८०, ४५४, भादंवी | रवि नगर गल्ली नं ३ अमरावती | दि. २२.०४.२०२३ चे १०.३० वा ते २१.०० वा दाखल ता.वेळ दि. २३.०४.२०२३ चे ०२.२८ वा. | महेंद्र जालनसिंग बैस वय- ३८ रा. रवि नगर गल्ली नं ३ अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील घ. ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्याचे घराला कुलुप कोंडा लावुन त्यांचे ड्युटीवर गेले व परत आले तेव्हा त्यांना त्याचे घराचे लोखंडी गेट व किचनचा मागच्या दरवाज्याच्या कोणीतरी अज्ञात चोराने कुलुप कोंडा तोडुन घरात प्रवेश करुन घरा मध्ये ठेवलेले एक पितळाची मोठी बकेट , पितळाचे दोन गेंज , पितळाचा एक लोटा व एल्युमिनीयमची बकेट एकुण अं कि. २५००/- रु चा माल चोरुन नेला अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुहा दाखल |

➢ चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो.स्टे. सिटी कोतवाली अप.क्र. १७८/२०२३ कलम ३७९ | अमरावती | दि. २३/०४/२०२३ चे १०.३० वा दाखल ता. वेळ दि. २३/०४/२०२३ चे १५.१० | एक महिला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी ही ऑटोने राजकमल चौक येथे आली व भुषण मेडीकल येथून औषधी घेवून बाहेर थांबली असता एक अनोळखी ईसम वय अंदाजे २३ ते २४ वर्ष चेह-याला पांढ-या रंगाचा दुपटटा बांधलेला पांढ-या कलरचे फुल बाहीचे शर्ट व काळा पॅन्ट घातलेला त्याची दुचाकी घेवून फिर्यादी जवळ आला व फिर्यादीला आजी तुला जिथे जायचे आहे तिथे सोडतो असे म्हणाला. त्यावर फिर्यादीने मी तुला ओळखत नाही कसे बसु असे म्हटले असता तुझे वय जास्त आहे व उन पण खुप आहे असे त्याने म्हटले त्यामुळे फिर्यादी त्याचे दुचाकी गाडीवर बसली. फिर्यादी जवळील बॅग अनोळखी इसमाने त्याचे जवळ घेतली व फिर्यादीला राजापेठ रोडने मनिबाई गुजराती शाळेकडील रोडने घेवून जात आहे असे विचारले असता त्याने गाडी थांबविली व फिर्यादीला त्याचे |

|  |  |  |  |  |  |  |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
|  | भादवि |  | वा. |  |  | आईला भेटायला घेवून येतो असे म्हणून फिर्यादीला गाडीचे खाली उतरवुन तिची बॅग खाली टाकुन निघून गेला. फिर्यादीने बॅग चेक केली असता त्यामध्ये असलेली पिवळया रंगाची पर्स दिसुन आली नाही. सदर पर्स मध्ये नगदी ७०००/- रु व एलआयसीचे कागदपत्र होते ते दिसुन आले नाही. नमुद अनोळखी ईसमाने चोरुन नेले. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

- ईतर :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | बडनेरा अप क्र. २९३/२०२३ कलम २९४, ५०६ , ३४ भादंवी. | बडनेरा | दि.२२.०४.२०२३ चे २०.०० वा. माहिती वेळ दि.२३.०४.२०२३ चे ११.३० वा. दाखल.ता.वेळ दि.२३.०४.२०२३ चे १२.०१ वा. | एक महिला | १)रमेश बाबुलाल सुपनर , वय ५५ वर्षे २)निलेश रमेश सुपनर , वय ४० वर्षे , दोन्ही रा.ग्राम चांदोरी , ता.जि.अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच गावात राहत असुन यातील आरोपींनी फि.च्या घरासमोरील ग्रामपंचायतीच्या खुल्या जागेवर कंपाऊंड टाकण्याकरीता जमिनीमध्ये लोखंडी एंगल गाडले या कारणावरून नमुद घटना.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी हिने आरोपींना तुम्ही ग्रामपंचायतीच्या खुल्या जागेवर कंपाऊंड टाकत आहे त्यामुळे मला व गावातील लोकांना जाणेयेणेस रस्ता राहणार नाही असे म्हटले असता दोन्ही आरोपींनी फि.सोबत बाचाबाची करून फि.ला अश्लिल शिवीगाळ करून तुमच्याकडुन जे होते करून घ्या मी तुम्हाला बघुन घेतो अशी धमकी दिली. अशा फि.च्या जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १. | पो स्टे गाडगे नगर | अप क्र ५६७/२३ कलम ६५ ई मदाका | विलास नगर अमरावती | दि.२३.०४.२३ चे ०७.०० वा | दि २३.०४.२३ चे १५.१९ वा | सरतर्फे पोहेका उमेश नैताम ब नं १०५८ पो स्टे गाडगे नगर अमरावती | किरण रामलखन पाल वय २५ वर्ष रा विलास नगर अमरावती | यातील नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे दि.२३.०४.२३ चे ०७.०० वा विलास नगर परिसरात पेट्रोलिंग करित असता मोपेड क्र एम एच २७ ए वाय ०६७९ वर अवैध्य रित्या बॉक्समध्ये १२ नग टँगो पंच देशी दारु १८० एम एल कि अं ८४० रु ,३६ नग बॉबी संत्रा देशी दारु १८० एम एल च्या कि अं २५२० रु तसेच मोपेड कि अं ३०००० रु असा एकुण ३३३६० रु चा माल अवैध्य रित्या घेऊन जातांना मिळुन आला. अश्या फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २. | पो स्टे गाडगे नगर | अप क्र ५६८/२३ कलम ६५ ई मदाका | विलास नगर अमरावती | दि.२३.०४.२३ चे ०८.३० वा | दि २३.०४.२३ चे १५.३४ वा | सरतर्फे पोहेका उमेश नैताम ब नं १०५८ पो स्टे गाडगे नगर अमरावती | अशोक केरुजी सावळे वय ४० वर्ष रा भिम नगर अमरावती | यातील नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे दि.२३.०४.२३ चे ०७.०० वा विलास नगर परिसरात पेट्रोलिंग करित असता एक इसम त्याचे ताब्यातील बजाज पल्सर मोटर सायकलवर एम एच २७ बीआर ०८७१ या वाहनावर अवैध्यरित्या एका पुष्टाचे बॉक्समध्ये ४८ नग देशी दारु पावट्या,बॉबी संत्रा १८० एम एल च्या कि अं ३३६० रु चा माल पल्सर कि ५०००० रु असा एकुण ५३३६० चा माल अवैध्यरित्या घेऊन जातांना मिळुन आला. अश्या फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३. | पोस्टे राजापेठ | अप क्र ३८५/२३ कलम ६५ ई मदाका | जनता कॉलनी माया नगर अमरावती | घ.ता.वेळ दिनांक २३.०४.२०२३ चे १०.३० वा | दा.ता.वेळ दि. २३.०४.२०२३ चे १३.४३ वा | ` सर तर्फे सपोउपनि प्रकाश जगताप ब नं ७८६ पोस्टे राजापेठ | पुरुषोत्तम भीमरावजी पटकतलवारे वय ३६ रा. कुंभारवाडा अम. | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद इसमावर प्रोव्ही रेट केली असता त्याचे ताब्यातुन वरील प्रमाणे प्रोव्ही माल मिळुन आला नमुद इसम हा अवैदद्य रित्या कोणताही परवाना नसतांना वरील प्रमाणे प्रोव्ही माल बाळगतांना मिळुन आला त्याचे कृत्य ६५ ई मदाका प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल |
| ४. | पोस्टे राजापेठ | अप क्र ३८६/२३ कलम ६५ ई मदाका | MIDC चौक अस्पा बंड वर्कशॉपचे भींती लगत अमरावती | घ.ता.वेळ दिनांक २३.०४.२०२३ चे १३.३०वा | दा.ता.वेळ दि. २३.०४.२०२३ चे १४.५९ वा | ` सर तर्फे सपोउपनि प्रकाश जगताप ब नं ७८६ पोस्टे राजापेठ | अशोककुमार घनश्यामदास चोचलानी वय ५५ रा. दस्तुन नगर गल्ली नं २ अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की घ.ता.वेळी व ठिकाणी अवैद्य रित्या देशी दारुची किरकोळ विक्री करीत असतांना मीळुन आला त्याचे कृत्य ६५ ई मदाका प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.<br>दाखल |